1. शस्त्र परवाना

1 ते 5 दिवस

नवीन शस्त्र परवान्यासाठी अर्जदाराने नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर येथे अर्ज सादर करावा. नागरी सुविधा केंद्र येथील पोलीस अंमलदार यांनी सदर अर्जासोबत फोटो, जन्म दिनांकाचा पुरावा, ओळखपत्र ज्यामध्ये आधारकार्ड, आधारकार्ड नसल्यास लेखी प्रतिज्ञापत्रासह निवडणूक ओळखपत्र, पॅनकार्ड किंवा ओळखपत्र, राहण्याचा पुरावा, एस 1 फॉर्म मध्ये प्रशिक्षण प्रमाणपत्र, फॉर्म एस 2 मध्ये अंडरटेकिंग, फॉर्म एस 3 मध्ये वैद्यकीय प्रमाणपत्र, शैक्षणिक तसेच व्यावसायीक पात्रतेचे स्वयंसाक्षांकित प्रमाणपत्र, अर्जदार वन विभागाच्या अखत्यारित राहत असल्यास वनविभागाचे नाहरकत प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांची पडताळणी करून अर्जदारास नोंदणी क्रमांक द्यावा व सदरचा अर्ज परवाना शाखेकडे पाठवावा. सदरचा अर्ज परवाना शाखा यांनी पडताळणी करून सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन यांचे स्वाक्षरीने अहवालाकरीता थेट सबंधित पोलीस ठाण्याकडे पाठवावा.

6 ते 20 दिवस

पोलीस ठाण्यात सदर अर्ज पडताळणी कामी आल्यानंतर

- परवाना अंमलदारांनी विहीत नमुन्यातील शस्त्र नोंद वहीत त्याची नोंद घ्यावी आणि शस्त्र परवाना अर्जात नमुद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने वरील कागदपत्रांव्यतिरिक्त आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे प्राप्त करून घ्यावी.
- बीट अधिकारी/अंमलदार यांनी राहते जागेची पडताळणी करावी. त्याप्रमाणे अर्जात नमुद केलेल्या कारणांची सत्यता पडताळून पाहावी.
- परवाना अंमलदाराने कागदपत्रांची जुळणी करून सदर अर्ज वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे मुलाखत व इतर कार्यवाहीसाठी दयावा.
- वपोनि यांनी अर्जदारास पोलीस ठाण्यास बोलाऊन त्यांची मुलाखत घ्यावी. अर्जदाराच्या शस्त्र हाताळण्याच्या क्षमतेची पारख (शारीरीक आणि मानसिक दृष्ट्या तंदुरूस्त असल्याबाबत) करावी. मात्र नागरी सेवेतील नोकर, लष्कर/नौदल/वायुदल/पोलीस यांना मुलाखतीसाठी पोलीस ठाण्यात बोलवण्याची गरज नाही. त्यांची मुलाखत सबंधित प्राधिकारी घेतील.
- वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी सर्व कागदपत्रांची पडताळणी करून अर्जदार यांनी नमुद केलेल्या कारणांची सविस्तर पडताळणी करून त्याबाबतचा त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांना अहवाल सादर करावा.

21 ते 30 दिवस

सबंधित परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी त्यांना अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराची मुलाखत घेऊन त्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालय या ठिकाणी पाठवावा.

31 ते 90 दिवस

पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखा यांनी तो अर्ज अंतिम निर्णयासाठी पोलीस आयुक्तांकडे सादर करावा. जर परवान्यास मान्यता मिळाली तर अर्जदारास दुरध्वनीव्दारे आणि सबंधित पोलीस ठाणे मार्फत पत्र पाठवुन कळवावे. अर्जदाराने सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन यांचे समक्ष परवाना पुस्तकावर सही करावी व 2100 रूपये भरून परवाना प्राप्त करून घ्यावा.

2. सायबर परवाना

1 ते 5 दिवस

सायबर परवान्यासाठी अर्जदाराने नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर येथे अर्ज सादर करावा. नागरी सुविधा केंद्र येथील पोलीस अंमलदार यांनी सदर अर्जासोबत अग्निशमन दलाचा दाखला, विद्युत दाखला, गुमास्ता इत्यादी कागदपत्रांची पडताळणी करून अर्जदारास नोंदणी क्रमांक द्यावा व सदरचा अर्ज परवाना शाखेकडे पाठवावा. सदरचा अर्ज परवाना शाखा यांनी पडताळणी करून सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन यांचे स्वाक्षरीने अहवालाकरीता थेट सबंधित पोलीस ठाण्याकडे पाठवावा.

6 ते 20 दिवस

पोलीस ठाण्यात सदर अर्ज पडताळणी कामी आल्यानंतर

- परवाना अंमलदारांनी विहीत नमुन्यातील सायबर परवाना नोंद वहीत त्याची नोंद घ्यावी आणि शस्त्र परवाना अर्जात नमुद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने वरील कागदपत्रांव्यतिरिक्त आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे प्राप्त करून घ्यावी.
- बीट अधिकारी/अंमलदार यांनी राहते जागेची पडताळणी करावी. त्याप्रमाणे अर्जात नमुद केलेल्या कारणांची सत्यता पडताळून पाहावी.
- परवाना अंमलदाराने कागदपत्रांची जुळणी करून सदर अर्ज वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे मुलाखत व इतर कार्यवाहीसाठी दयावा.
- वपोनि यांनी सर्व कागदपत्र व अर्जदार यांनी दिलेल्या कारणाची पडताळणी करून त्याबाबतचा त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांना अहवाल सादर करावा.

21 ते 30 दिवस

सबंधित परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी त्यांना अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराची मुलाखत घेऊन त्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालय या ठिकाणी पाठवावा.

31 ते 90 दिवस

पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखा यांनी तो अर्ज अंतिम निर्णयासाठी पोलीस आयुक्तांकडे सादर करावा. जर परवान्यास मान्यता मिळाली तर अर्जदारास दुरध्वनीव्दारे आणि सबंधित पोलीस ठाणे मार्फत पत्र पाठवुन कळवावे. अर्जदाराने पोलीस उप आयुक्त, मुख्यालय 1 यांचे समक्ष सायबर परवाना व प्रती संगणक 600 रूपये प्रमाणे भरून परवाना प्राप्त करून घ्यावा.

3. व्हिडीओ सेंटर परवाना

1 ते 5 दिवस

व्हिडीओ सेंटर परवान्यासाठी अर्जदाराने नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर येथे अर्ज सादर करावा. नागरी सुविधा केंद्र येथील पोलीस अंमलदार यांनी सदर अर्जासोबत अग्निशमन दलाचा दाखला, विद्युत दाखला, गुमास्ता, करारनामा, प्रतिज्ञापत्र, जागेचा नकाशा, इत्यादी कागदपत्रांची पडताळणी करून अर्जदारास नोंदणी क्रमांक द्यावा व सदरचा अर्ज परवाना शाखेकडे पाठवावा. सदरचा अर्ज परवाना शाखा यांनी पडताळणी करून सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन यांचे स्वाक्षरीने अहवालाकरीता थेट सबंधित पोलीस ठाण्याकडे व पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांना पाठवावा.

6 ते 20 दिवस

पोलीस ठाण्यात सदर अर्ज पडताळणी कामी आल्यानंतर

- परवाना अंमलदारांनी विहीत नमुन्यातील व्हिडीओ सेंटर परवाना नोंद वहीत त्याची नोंद घ्यावी आणि व्हिडीओ सेंटर परवाना अर्जात नमुद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने वरील कागदपत्रांव्यतिरिक्त आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे प्राप्त करून घ्यावी.
- बीट अधिकारी/अंमलदार यांनी राहते जागेची पडताळणी करावी. त्याप्रमाणे अर्जात नमुद केलेल्या कारणांची सत्यता पडताळून पाहावी.
- परवाना अंमलदाराने कागदपत्रांची जुळणी करून सदर अर्ज वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे मुलाखत व इतर कार्यवाहीसाठी दयावा.
- वपोनि यांनी सर्व कागदपत्र व अर्जदार यांनी दिलेल्या कारणाची पडताळणी करून त्याबाबतचा त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल सहाय्यक पोलीस आयुक्त यांना सादर करावा. सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी अहवालांची पडताळणी करून त्यांचे स्वयंस्पष्ट अहवालासह परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांना अहवाल सादर करावा.

21 ते 30 दिवस

सबंधित परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी त्यांना अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराची मुलाखत घेऊन त्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालय या ठिकाणी पाठवावा.

तसेच पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांनी त्यांचे वाहतुकीचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालयास सादर करावा.

31 ते 90 दिवस

पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखा यांनी तो अर्ज अंतिम निर्णयासाठी पोलीस आयुक्तांकडे सादर करावा. जर परवान्यास मान्यता मिळाली तर अर्जदारास दुरध्वनीव्दारे आणि सबंधित पोलीस ठाणे मार्फत पत्र पाठवुन कळवावे. अर्जदाराने पोलीस उप आयुक्त, मुख्यालय 1 यांचे समक्ष परवाना प्राप्त करून घ्यावा.

4. चित्रपटगृह परवाना

1 ते 5 दिवस

चित्रपटगृह परवान्यासाठी अर्जदाराने नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर येथे अर्ज सादर करावा. नागरी सुविधा केंद्र येथील पोलीस अंमलदार यांनी सदर अर्जासोबत अग्निशमन दलाचा दाखला, विद्युत दाखला, गुमास्ता, करारनामा, प्रतिज्ञापत्र, जागेचा नकाशा, इत्यादी कागदपत्रांची पडताळणी करून अर्जदारास नोंदणी क्रमांक द्यावा व सदरचा अर्ज परवाना शाखेकडे पाठवावा. सदरचा अर्ज परवाना शाखा यांनी पडताळणी करून सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासनयांचे स्वाक्षरीने अहवालाकरीता थेट सबंधित पोलीस ठाण्याकडे व पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांना पाठवावा.

6 ते 20 दिवस

पोलीस ठाण्यात सदर अर्ज पडताळणी कामी आल्यानंतर

- परवाना अंमलदारांनी विहीत नमुन्यातील चित्रपट गृह परवाना नोंद वहीत त्याची नोंद घ्यावी आणि व्हिडीओ सेंटर परवाना अर्जात नमुद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने वरील कागदपत्रांव्यतिरिक्त आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे प्राप्त करून घ्यावी.
- बीट अधिकारी/अंमलदार यांनी राहते जागेची पडताळणी करावी. त्याप्रमाणे अर्जात नमुद केलेल्या कारणांची सत्यता पडताळून पाहावी.
- परवाना अंमलदाराने कागदपत्रांची जुळणी करून सदर अर्ज वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे मुलाखत व इतर कार्यवाहीसाठी दयावा.
- वपोनि यांनी सर्व कागदपत्र व अर्जदार यांनी दिलेल्या कारणाची पडताळणी करून त्याबाबतचा त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल सहाय्यक पोलीस आयुक्त यांना सादर करावा. सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी अहवालांची पडताळणी करून त्यांचे स्वयंस्पष्ट अहवालासह परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांना अहवाल सादर करावा.

21 ते 30 दिवस

सबंधित परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी त्यांना अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराची मुलाखत घेऊन त्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालय या ठिकाणी पाठवावा.

तसेच पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांनी त्यांचे वाहतुकीचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालयास सादर करावा.

31 ते 90 दिवस

पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखा यांनी तो अर्ज मा. पोलीस आयुक्तांकडे षिफारषीकरीता पाठविण्यात यावा. पोलीस आयुक्त यांची षिफारस झाल्यानंतर सदरचा संपुर्ण अहवाल शासन मान्यतेकरीता शासनास सादर करावा. शासनाकडून मान्यता मिळाली तर अर्जदारास दुरध्वनीव्दारे आणि सबंधित पोलीस ठाणे मार्फत पत्र पाठवुन कळवावे. अर्जदाराने पोलीस उप आयुक्त, मुख्यालय 1 यांचे समक्ष परवाना प्राप्त करून घ्यावा.

5. पेट्रोलियम पदार्थ/सल्फर साठा परवाना

1 ते 5 दिवस

पेट्रोलियिम/सल्फर साठा परवान्यासाठी अर्जदाराने नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर येथे अर्ज सादर करावा. नागरी सुविधा केंद्र येथील पोलीस अंमलदार यांनी सदर अर्जासोबत अग्निशमन दलाचा दाखला, विद्युत दाखला, गुमास्ता, करारनामा, प्रतिज्ञापत्र, जागेचा नकाशा, विस्फोटक विभाग यांचेकडील प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांची पडताळणी करून अर्जदारास नोंदणी क्रमांक द्यावा व सदरचा अर्ज परवाना शाखेकडे पाठवावा. सदरचा अर्ज परवाना शाखा यांनी पडताळणी करून सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन यांचे स्वाक्षरीने अहवालाकरीता थेट सबंधित पोलीस ठाण्याकडे व पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांना पाठवावा.

5 ते 20 दिवस

पोलीस ठाण्यात सदर अर्ज पडताळणी कामी आल्यानंतर

- परवाना अंमलदारांनी विहीत नमुन्यातील नोंद वहीत त्याची नोंद घ्यावी, आणि पेट्रोलियम नाहरकत दाखला अर्जात नमुद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने वरील कागदपत्रांव्यतिरिक्त आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे प्राप्त करून घ्यावी.
- बीट अधिकारी/अंमलदार यांनी नमुद जागेची पडताळणी करावी. त्याप्रमाणे अर्जात नमुद केलेल्या कारणांची सत्यता पडताळून पाहावी.
- परवाना अंमलदाराने कागदपत्रांची जुळणी करून सदर अर्ज वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे मुलाखत व इतर कार्यवाहीसाठी दयावा.
- वपोनि यांनी सर्व कागदपत्र व अर्जदार यांनी दिलेल्या कारणाची पडताळणी करून त्याबाबतचा त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल सहाय्यक पोलीस आयुक्त यांना सादर करावा. सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी अहवालांची पडताळणी करून त्यांचे स्वयंस्पष्ट अहवालासह परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांना अहवाल सादर करावा.

21 ते 30 दिवस

सबंधित परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी त्यांना अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराची मुलाखत घेऊन त्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालय या ठिकाणी पाठवावा.

तसेच पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांनी त्यांचे वाहतुकीचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालयास सादर करावा.

31 ते 90 दिवस

पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखा यांनी तो अर्ज अंतिम निर्णयासाठी पोलीस आयुक्तांकडे सादर करावा. जर परवान्यास मान्यता मिळाली तर अर्जदारास दुरध्वनीव्दारे आणि सबंधित पोलीस ठाणे मार्फत पत्र पाठवुन कळवावे. अर्जदाराने पोलीस उप आयुक्त, मुख्यालय 1 यांचे समक्ष परवाना प्राप्त करून घ्यावा.

6. ऑक्रेस्ट्रा परवाना

1 ते 5 दिवस

ऑक्रेस्ट्रा परवान्यासाठी नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर येथे अर्ज सादर करावा. नागरी सुविधा केंद्र येथील पोलीस अंमलदार यांनी सदर अर्जासोबत विद्युत निरीक्षक यांचे प्रमाणपत्र, आरोग्य विभाग प्रमाणपत्र, भाडेकरार प्रत, करमणुक कर भरल्याचे प्रमाणपत्र, दुकान व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र, ध्वनी अभेद्य प्रमाणपत्र, छुपी खोली नसल्याबाबतचे वास्तु प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांची पडताळणी करून अर्जदारास नोंदणी क्रमांक द्यावा व सदरचा अर्ज परवाना शाखेकडे पाठवावा. सदरचा अर्ज परवाना शाखा यांनी पडताळणी करून सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन यांचे स्वाक्षरीने अहवालाकरीता थेट सबंधित पोलीस ठाण्याकडे व पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांना पाठवावा.

5 ते 20 दिवस

पोलीस ठाण्यात सदर अर्ज पडताळणी कामी आल्यानंतर

- परवाना अंमलदारांनी विहीत नमुन्यातील नोंद वहीत त्याची नोंद घ्यावी आणि ऑक्रेस्ट्रा परवाना अर्जात नमुद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने वरील कागदपत्रांव्यतिरिक्त आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे प्राप्त करून घ्यावी.
- बीट अधिकारी/अंमलदार यांनी नमुद जागेची पडताळणी करावी. त्याप्रमाणे अर्जात नमुद केलेल्या कारणांची सत्यता पडताळून पाहावी.
- परवाना अंमलदाराने कागदपत्रांची जुळणी करून सदर अर्ज वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे मुलाखत व इतर कार्यवाहीसाठी दयावा.
- वपोनि यांनी सर्व कागदपत्र व अर्जदार यांनी दिलेल्या कारणाची पडताळणी करून त्याबाबतचा त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल सहाय्यक पोलीस आयुक्त यांना सादर करावा. सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी अहवालांची पडताळणी करून त्यांचे स्वयंस्पष्ट अहवालासह परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांना अहवाल सादर करावा.

21 ते 30 दिवस

सबंधित परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी त्यांना अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराची मुलाखत घेऊन त्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालय या ठिकाणी पाठवावा.

तसेच पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांनी त्यांचे वाहतुकीचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालयास सादर करावा.

31 ते 60 दिवस

पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखा यांनी तो अर्ज अंतिम निर्णयासाठी पोलीस आयुक्तांकडे सादर करावा. जर परवान्यास मान्यता मिळाली तर अर्जदारास दुरध्वनीव्दारे आणि सबंधित पोलीस ठाणे मार्फत पत्र पाठवुन कळवावे. अर्जदाराने पोलीस उप आयुक्त, मुख्यालय 1 यांचे समक्ष परवाना प्राप्त करून घ्यावा.

7. पेट्रोलियम ना हरकत दाखला (पेट्रोलपंप, डिझेलपंप आणि सीएनजी पंप)

1 ते 5 दिवस

पेट्रोलियम ना हरकत दाखल्यासाठी नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर येथे अर्ज सादर करावा. नागरी सुविधा केंद्र येथील पोलीस अंमलदार यांनी सदर अर्जासोबत विस्फोटक विभाग यांचे प्रमाणपत्र, नमुना फार्म IX मध्ये, सार्वजनिक बांधकाम विभाग/महानगरपालिका/नगरपरिषद/जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडील बांधकाम प्रमाणपत्र, अग्निशमन विभाग प्रमाणपत्र, करारनामा प्रत, विस्फोटक विभाग यांचेकडील जागेचे साक्षांकित नकाशे इत्यादी कागदपत्रांची पडताळणी करून अर्जदारास नोंदणी क्रमांक द्यावा व सदरचा अर्ज परवाना शाखेकडे पाठवावा. सदरचा अर्ज परवाना शाखा यांनी पडताळणी करून सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन यांचे स्वाक्षरीने अहवालाकरीता थेट सबंधित पोलीस ठाण्याकडे व पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांना पाठवावा.

6 ते 20 दिवस

पोलीस ठाण्यात सदर अर्ज पडताळणी कामी आल्यानंतर

- परवाना अंमलदारांनी विहीत नमुन्यातील नोंद वहीत त्याची नोंद घ्यावी आणि पेट्रोलियम ना हरकत दाखला अर्जात नमुद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने वरील कागदपत्रांव्यतिरिक्त आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे प्राप्त करून घ्यावी.
- बीट अधिकारी/अंमलदार यांनी नमुद जागेची पडताळणी करावी. त्याप्रमाणे अर्जात नमुद केलेल्या कारणांची सत्यता पडताळून पाहावी.
- परवाना अंमलदाराने कागदपत्रांची जुळणी करून सदर अर्ज वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे मुलाखत व इतर कार्यवाहीसाठी दयावा.
- वपोनि यांनी सर्व कागदपत्र व अर्जदार यांनी दिलेल्या कारणाची पडताळणी करून त्याबाबतचा त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल सहाय्यक पोलीस आयुक्त यांना सादर करावा. सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी अहवालांची पडताळणी करून त्यांचे स्वयंस्पष्ट अहवालासह परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांना अहवाल सादर करावा.

21 ते 30 दिवस

सबंधित परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी त्यांना अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराची मुलाखत घेऊन त्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालय या ठिकाणी पाठवावा.

तसेच पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांनी त्यांचे वाहतुकीचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालयास सादर करावा.

31 ते 60 दिवस

पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखा यांनी तो अर्ज अंतिम निर्णयासाठी पोलीस आयुक्तांकडे सादर करावा. जर परवान्यास मान्यता मिळाली तर अर्जदारास दुरध्वनीव्दारे आणि सबंधित पोलीस ठाणे मार्फत पत्र पाठवुन कळवावे. अर्जदाराने पोलीस उप आयुक्त, मुख्यालय 1 यांचे समक्ष ना हरकत दाखला प्राप्त करून घ्यावा.

8. विस्फोटक नियंत्रण ना हरकत दाखला

1 ते 5 दिवस

विस्फोटक नियंत्रण ना हरकत दाखल्यासाठी नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर येथे अर्ज सादर करावा. नागरी सुविधा केंद्र येथील पोलीस अंमलदार यांनी सदर अर्जासोबत विस्फोटक विभाग यांचे प्रमाणपत्र, स्फोटक पदार्थ वाहतुक परवाना, वक्र ऑर्डर, जिल्हाधिकारी कार्यालयाकडील खनिज उत्खनन प्रमाणपत्र, जागेचा 7/12 उतारा, फॉर्म एलई–3 इत्यादी कागदपत्रांची पडताळणी करून अर्जदारास नोंदणी क्रमांक द्यावा व सदरचा अर्ज परवाना शाखेकडे पाठवावा. सदरचा अर्ज परवाना शाखा यांनी पडताळणी करून सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन यांचे स्वाक्षरीने अहवालाकरीता थेट सबंधित पोलीस ठाण्याकडे पाठवावा.

6 ते 20 दिवस

पोलीस ठाण्यात सदर अर्ज पडताळणी कामी आल्यानंतर

- परवाना अंमलदारांनी विहीत नमुन्यातील नोंद वहीत त्याची नोंद घ्यावी आणि विस्फोटक नियंत्रण ना हरकत दाखला अर्जात नमुद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने वरील कागदपत्रांव्यतिरिक्त आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे प्राप्त करून घ्यावी.
- बीट अधिकारी/अंमलदार यांनी नमुद जागेची पडताळणी करावी. त्याप्रमाणे अर्जात नमुद केलेल्या कारणांची सत्यता पडताळून पाहावी.
- परवाना अंमलदाराने कागदपत्रांची जुळणी करून सदर अर्ज वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे मुलाखत व इतर कार्यवाहीसाठी दयावा.
- वपोनि यांनी सर्व कागदपत्र व अर्जदार यांनी दिलेल्या कारणाची पडताळणी करून त्याबाबतचा त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल सहाय्यक पोलीस आयुक्त यांना सादर करावा. सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी अहवालांची पडताळणी करून त्यांचे स्वयंस्पष्ट अहवालासह परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांना अहवाल सादर करावा.

21 ते 30 दिवस

सबंधित परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी त्यांना अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराची मुलाखत घेऊन त्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालय या ठिकाणी पाठवावा.

31 ते 60 दिवस

पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखा यांनी तो अर्ज अंतिम निर्णयासाठी पोलीस आयुक्तांकडे सादर करावा. जर ना हरकत दाखल्यास मान्यता मिळाली तर अर्जदारास दुरध्वनीव्दारे आणि सबंधित पोलीस ठाणे मार्फत पत्र पाठवुन कळवावे. अर्जदाराने पोलीस उप आयुक्त, मुख्यालय 1 यांचे समक्ष ना हरकत दाखला प्राप्त करून घ्यावा.

9. फटाका परवाना

1 ते 5 दिवस

फटाका परवान्यासाठी नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर येथे अर्ज सादर करावा. नागरी सुविधा केंद्र येथील पोलीस अंमलदार यांनी सदर अर्जासोबत महानगरपालिकेचे नाहरकत दाखला, अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला, विद्युत निरीक्षक यांचा नाहरकत दाखला, सबंधित जागेचे कागदपत्र, नियोजीत जागेचे आजुबाजूचे दुकानदारांचे नाहरकत दाखले, शॉप लायसन्स, गुमास्ता, अर्जदार आधारकार्ड, पॅनकार्ड, सेफ्टी फायर परवाना इत्यादी कागदपत्रांची पडताळणी करून अर्जदारास नोंदणी क्रमांक द्यावा व सदरचा अर्ज परवाना शाखेकडे पाठवावा. सदरचा अर्ज परवाना शाखा यांनी पडताळणी करून सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन यांचे स्वाक्षरीने अहवालाकरीता थेट सबंधित पोलीस ठाण्याकडे पाठवावा.

6 ते 20 दिवस

पोलीस ठाण्यात सदर अर्ज पडताळणी कामी आल्यानंतर

- परवाना अंमलदारांनी विहीत नमुन्यातील नोंद वहीत त्याची नोंद घ्यावी आणि विस्फोटक नियंत्रण ना हरकत दाखला अर्जात नमुद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने वरील कागदपत्रांव्यतिरिक्त आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे प्राप्त करून घ्यावी.
- बीट अधिकारी/अंमलदार यांनी नमुद जागेची पडताळणी करावी. त्याप्रमाणे अर्जात नमुद केलेल्या कारणांची सत्यता पडताळून पाहावी.
- परवाना अंमलदाराने कागदपत्रांची जुळणी करून सदर अर्ज वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे मुलाखत व इतर कार्यवाहीसाठी दयावा.
- वपोनि यांनी सर्व कागदपत्र व अर्जदार यांनी दिलेल्या कारणाची पडताळणी करून त्याबाबतचा त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल सहाय्यक पोलीस आयुक्त यांना सादर करावा. सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी अहवालांची पडताळणी करून त्यांचे स्वयंस्पष्ट अहवालासह परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांना अहवाल सादर करावा.

21 ते 30 दिवस

सबंधित परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी त्यांना अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराची मुलाखत घेऊन त्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालय या ठिकाणी पाठवावा.

31 ते 60 दिवस

पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखा यांनी तो अर्ज अंतिम निर्णयासाठी पोलीस आयुक्तांकडे सादर करावा. जर परवान्यास मान्यता मिळाली तर अर्जदारास दुरध्वनीव्दारे आणि सबंधित पोलीस ठाणे मार्फत पत्र पाठवुन कळवावे. अर्जदाराने पोलीस उप आयुक्त, मुख्यालय 1 यांचे समक्ष फटाका परवाना प्राप्त करून घ्यावा.